**<u>नि.दि.दा.क्र.१७३/२०१६</u>**
नि.क्र.२९६ लगत
दि.१२.०३.२०२६

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ चा शपथेवर जबाबः–</u>**

**नांव :– सुरेश माणिकचंद मांडोत.**

८. <u>माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**(एस.ए.विराणी)**

दि. १२.०३.२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. येळे यांच्यातर्फेः–</u>**

९. आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ११८ वरील ताबेसाठेखताचा दस्त जतनबाई कुंतीलाल मांडोत यांनी विशाल सुरेश मांडोत याला करुन दिलेला दि. १४.१२.२००० रोजीचा दस्त आहे. सदरचा दस्त जतनबाई यांच्या सांगण्यानुसार तयार करण्यात आला. सदरचा दस्त तयार करतेवेळी मी, विशाल, जतनबाई, जवाहर हस्तीमल कटारिया हजर होते. सदर दस्तावर जतनबाई यांनी माझ्यासमक्ष सही केली केली. सदर दस्तावर साक्षीदार क्र. १ म्हणून माझी सही आहे. दुसरा साक्षीदार जवाहर कटारिया होते आणि तिसरा मंडागळे म्हणून होते. सदरचा दस्त रु. १,२०,०००/– साठी ठरला होता ज्यापैकी दस्त करण्याच्या दिवशी रु. ९०,०००/– रोखीने दिले होते. रक्कम दिल्यानंतर वादातील दस्त झाल्यावर जतनबाई यांनी विशालला त्याच दिवशी ताबा दिला होता. सदर दस्तातील व्यवहार माझ्यासमक्ष ठरला होता व त्यातील मजकूर माझ्यासमक्ष लिहीण्यात आला होता जो खरा व बरोबर आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एस. काळे यांच्यामार्फत</u>**

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, वादी माझा मुलगा असल्यामुळे प्रस्तुत दाव्याबाबत आणि वादातील दस्ताबाबत मला सर्व माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यात दाखल केलेले सर्व कागदपत्रे मला माझ्या मुलाने दाखवलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्याचा निकाल माझ्या मुलाच्या बाजूने लागावा अशी माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी केडगावला बरेच वर्षापासून राहत आहे. हे म्हणणे खरे

आहे की, केडगावला २००० साली बरेचशे नोटरी होते याची मला माहिती नाही. २००० सालीदेखील मला दौंडबाबतदेखील काही माहिती नाही. केडगाव ते पुण्याच्या मध्ये यवत, उरुळी, लोणी, हडपसर हे गावं लागतात. हे म्हणणे खरे आहे की, पुण्याच्या पुढे निगडी आहे. प्रस्तुत दाव्यात माहितीच्या अधिकाराखाली काढलेल्या कागदपत्रांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील दस्त झाले त्या दिवशी जतनबाई एकत्र कुटुंबात राहत होत्या. साक्षीदार म्हणतो, वेगळया राहत होत्या. १९९८ पासून जतनबाई वेगळया राहत होत्या. जतनबाई वेगळया राहत होत्या याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादातील दस्ताच्या पूर्वीपासून जतनबाई यांना वेगळे उत्पन्नाचे साधन नव्हते. जतनबाईच्या कुटुंबात त्यांचे मुले, मुली होते, परंतु जतनबाई एकटे वेगळे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, वादातील मिळकत खरेदी करण्यापूर्वी त्याचा वकीलांमार्फत सर्च रिपोर्ट काढलेला नाही. जतनबाई दि. ०६.०९.२००१ रोजी मयत झाल्या. जतनबाई रुबी हॉस्पीटल, पूणे येथे मयत झालया याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत होण्यापूर्वी जतनबाई बरेच महिने आजारी होते आणि त्या आजारातूनच त्यांचा मृत्यू झाला. जतनबाई आजारी असल्यामुळे त्यांना रुबी हॉस्पीटलमध्ये दाखल केले याबाबत मला माहिती नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत माझ्या मुलाच्या ताब्यात दि. ०८.०९.२०१० पासून भाडे कराराच्या आधारे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी लायसन्स फी २,०००/– आणि डिपॉझीट ३०,०००/– होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००० साली माझे चुलते बाबूलाल आणि प्रेमराज हे भाडयाने राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, फक्त कुंतीलाल हे स्वतःच्या मालकीच्या जागेत राहत होते. साक्षीदार म्हणतो, कुंतीलाल हे जतनबाई यांच्या जागेत राहत होते. दि. २२.०५.१९७१ रोजी जतनबाई यांना स्वतःच्या उत्पन्नाचे साधन होते अगर कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.०५.१९७१ पासून जतनबाई दावा मिळकतीच्या एकटया मालकी हक्काने ताबे वहिवाटीत होत्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, २००० साली जतनबाईच्या मुले त्यांच्यासोबत वाडयात राहत होत्या. साक्षीदार म्हणतो, त्या एकटयाच राहत होत्या. वादातील मिळकतीचे १९९८ साली बांधकाम झाले असून ती दोन मजली इमारत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद २ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाई एकटया राहत होत्या हे मी खोटे सांगत आहे.

**<u>मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/–

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः– १२.०३.२०२६.　　सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड, जि. पुणे.